# चार्वाक दर्शन

**प्रश्न-** चार्वाकांचा ज्ञानसिद्धांत प्रतिपादन करा (किंवा) " प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण आहे" चार्वाकाच्या अनुषंगाने स्पष्ट करा.

**उत्तर-** चार्वाक दर्शन हे नास्तिक किंवा अवैदिक परंपरेतील दर्शन आहे नास्तिक किंवा अवैदिक दर्शन म्हणजे जे दर्शन वेदातील तत्वज्ञान प्रमाण मानत नाही किंवा वेदांचे प्रामाण्य स्वीकारत नाही. चार्वाक दर्शनाचा आद्य प्रवर्तक बृहस्पती असावा असे मानले जाते. म्हणून त्यास बृहस्पती दर्शन दर्शन असेही म्हणतात. या दर्शनास लोकायत दर्शन असेही नाव आहे. यातील 'लोक' याचा अर्थ इहलोक तर आयत याचा अर्थ 'अधारित' असा होतो. म्हणून लोकांना मान्य असणारे किंवा 'इहलोकावर अधारित असणारे दर्शन असाही एक अर्थ सांगीतला जातो. चार्वाक हे नाव नंतरच्या काळात मिळालेले आहे. त्याचा शब्दश: अर्थ 'चारू' म्हण जे गोड, भुरळ पाडणारे आणि 'वाक ' म्हणजे बोलणे असा होतो. जे दर्शन सर्व सामान्याना भुरळ पाडेल, मोहवून टाकेल ते चार्वाक दर्शन होय.

चार्वाक दर्शनास बंडखोर दर्शन म्हणून ओळखले जाते कारण त्यांनी इतरांना अभिप्रेत असलेल्या वेद, ईश्वर,आत्मा,परलोक,पुनर्जन्म,कर्मसिद्धांत यासर्व गोष्टी नाकारल्या. या दर्शनावर स्वतंत्र असा ग्रंथ उपलब्ध नाही तरीपण त्यांची उपलब्ध असलेली १०-१२ सूत्रे व इतर दर्शनात त्यांचा झालेला उल्लेख यावरच चार्वाकांचे तत्त्वज्ञान समजून घ्यावे लागते-

चार्वाकांचा ज्ञानसिद्धांत:

ज्ञानसिद्धांतात प्रामुख्याने ज्ञानाविषयी चर्चा केली जाते. ज्ञान म्हणजे काय? ज्ञानाचे प्रकार किती ? ज्ञान मिळवण्याची साधने कोणती? यथार्थ ज्ञान म्हणजे काय? असे प्रश्न ज्ञानमीमांसेत चर्चिलेजातात. कोणतेही दर्शन ज्ञानाविषयी कोणती भूमिका स्वीकारते यावरच त्याचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ठरतो. चार्वाकांचे तत्त्वज्ञान त्यांच्या ज्ञानविषयक भूमिकेवरच आधारित आहे.

**<u>१) प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण आहे :</u>** भारतीय तत्वज्ञानात एकुण सहा प्रमाणे सांगीतली जातात. परंतू चार्वाक मात्र प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण स्वीकारतात. कारण त्यांच्या मते प्रत्यक्षाने मिळणारे ज्ञान थेट असते. त्यात कसलाही आडपडदा किंवा मध्यस्थी नसते. हे ज्ञान ठळक किंवा झगझगीत असते. या ज्ञानावर कसलाही संशय व्यक्त करता येत नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे इतर सर्व प्रमाणे प्रत्यक्ष प्रमाणावरच अधारित असतात. म्हणून इहलोकावर भर देणाऱ्या चार्वाकांनी प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण स्वीकारले, प्रत्यक्ष अनुभवास येणारे जग हीच वास्तवता स्वीकारली.

**२) अनुमान हे प्रमाण नाही :** बहुतेक दर्शने अनुमान हे प्रमाण स्वीकारतात. प्रत्यक्ष ज्ञानाच्या अधारे अप्रत्यक्ष ज्ञानाकडे जाणारी मानसिक प्रक्रिया म्हणजे अनुमान होय किंवा उपस्थित ज्ञानाच्या अधारे अनुपस्थित ज्ञानाकडे जाणारी विचार प्रक्रिया म्हणजे अनुमान होय. उदा. समोरील डोंगरावरील धुराचे मला होणारे ज्ञान प्रत्यक्ष असते. त्यावरून तिथे अग्नी असला पाहिजे हे होणारे ज्ञान अनुमानात्मक असते. परंतू चार्वाकांच्या मते अनुमानापासून मिळणारे ज्ञान सत्य म्हणून स्वीकारता येत नाही. कारण त्यासाठी प्रत्यक्ष ज्ञानाची गरज असते शिवाय अनुमानातून मिळणारे ज्ञान संभाव्य असते. त्यावर संशय व्यक्त करता येतो. म्हणून ते निर्विवाद ज्ञान नाही. अनुमान दोन प्रकारचे असते. विगमन आणि निगमन. परंतू या दोन्ही अनुमान प्रक्रियेत समस्या असल्याने त्यादेखील निर्दोष नाहीत. सारांश, अनुमानातून मिळणारे ज्ञान पूर्णपणे यथार्थ नसल्यामुळे अनुमान हे प्रमाण नाही.

**३) लोकप्रसिद्ध अनुमानास स्वीकृती :** चार्वाकांची अनुमान विषयक भूमिका स्वीकारली तर अनेक समस्या निर्माण होतात. कारण प्रत्यक्ष हा ज्ञान मिळवण्याचा मूलभूत प्रकार असला तरी बहुतांशी मानवी ज्ञान हे अनुमानातून शक्य होते. जवळपास सर्व मानवी व्यवहार अनुमानावर आधारित असतात. विस्तवाने हात भाजतो, अन्न सेवनाने शरीराचे पोषण होते, विष प्राशनाने मृत्यू येतो अशा कितीतरी गोष्टी आपण अनुमानाने शिकतो. एवढेच नाही तर शास्त्रीय स्वरुपाचे निष्कर्ष देखील अनुमानानेच काढले जातात. उष्णतेने धातू प्रसरण पावतात, पाण्याने बीज अंकुरित होते, मान्सुनी वाऱ्याने भारतात पाऊस पडतो असे कितीतरी निष्कर्ष अनुमानानेच काढले जातात.

ही अडचण लक्षात आल्याने नंतरच्या काळात सुशिक्षित चार्वाकांनी (पुरंदर) लोकप्रसिद्ध अनुमान स्वीकारले. लोकप्रसिद्ध अनुमान म्हणजे जे इहलोकावर, प्रत्यक्ष अनुभवावर अधारित आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानातील तार्किक प्रत्यक्षार्थवादासारखी ही भूमिका आहे,

जी अनुमाने अनुभवावर आधारित नाहीत अशी अनुमाने सुशिक्षीत चार्वाकांनी ही नाकारली. सारांश, सर्वात महत्वाच्या अनुमान प्रकारावर चार्वाकानी एवढी टीका केली. बाकीच्या शब्द वगैर प्रमाणांचा त्यांनी विचारसुद्धा केला नाही

***

प्रश्न- चार्वाक दर्शनातील जडवादाचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

चार्वाक दर्शनाचे जडवादाविषयीचे विवेचन सत्ताशास्त्रीय दृष्टिकोन होय. अखिल विश्वाचा आधार काय? किंवा या विश्वाच्या निर्मिती मागील मूलद्रव्य कोणते? ज्यांची निश्चित संख्या किती किंवा त्याचे नेमके स्वरूप काय ? अशा स्वरुपाच्या प्रश्नांचा विचार सत्ताशास्त्रात केला जातो. बाह्य स्वरूपी कितीही बदल झाले तरी जे अखेरपर्यंत टिकून राहते, कधीही नाश पावत नाही असे अविकारी तत्त्व म्हणजे 'अंतिम सत्य होय. या अंतीम तत्त्वाचाच विचार सत्ताशास्त्रात केला जातो.

कोणत्याही दर्शनाच्या अंतीम सत्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी त्यादर्शनाचे ज्ञानशास्त्र किंवा प्रमाणशास्त्र विचारात घ्यावे लागते. ते दर्शन कोणते प्रमाण स्वीकारते यावरच अंतिम सत्ता कोणती याचा विचार करावा लागतो. हाच न्याय चार्वाक दर्शनसही लागू आहे. चार्वाक प्रत्यक्ष प्रमाण स्वीकारतात. त्यामुळे त्यांचे सत्ताशास्त्रही प्रत्यक्षावर अधारित आहे. चार्वाकांनी अंतिम सत्ता जड स्वरूपी मानल्यामुळे त्यांच्या सत्ताशास्त्रीय मतास जडवाद असे म्हणतात. त्यांच्या जडवादात एकुण तीन सिद्धांत आहेत

**१) जडतत्त्ववाद :** या सिद्धांतानुसार अंतिम सत्य हे भौतिक किंवा जडस्वरूपी आहे. अंतीम सत्य म्हणजे जे तत्त्व अखेरपर्यंत टिकून राहते. चार्वाक प्रत्यक्षाने प्राप्त ज्ञानच स्वीकारत असल्यामुळे त्यांच्या मते पंचेंद्रियाने जे प्रतीत होईल तेच सत्य होय. या दृष्टीकोनानुसार पृथ्वी, जल, तेज, वायू ही चार महाभूतेच अंतिम सत्य आहेत. या अखिल विश्वाची निर्मिती या चार तत्त्वांच्या मिश्रणातूनच झाली आहे. त्यांच्या मते आकाश हे सत्य प्रत्यक्षग्राह्य नाही. ते अनुमानाने स्वीकारावे लागते म्हणून अनुमान नाकारणाऱ्या चार्वाकांनी त्यास अंतीम तत्त्व म्हणून स्वीकारले नाही. नंतरच्या काळात काही चार्वाकांनी आकाश या तत्त्वाला मान्यता दिली असली तरी बहुतेकांचा कल ते तत्त्व नाकारण्याकडेच आहे. सारांश, पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार तत्त्वांपासून केवळ जड सृष्टीचीच नव्हे तर आपल्या चैतन्ययुक्त देहाची निर्मिती झाली आहे. येथे असा प्रश्न निर्माण होतो की, वरील चार तत्वांच्या ठिकाणी चैतन्य हा धर्म नसताना, चैतन्य कसे निर्माण होते ? किंवा सृष्टीत चैतन्य कसे अनुभवास येते ? याला चार्वाकांचे असे प्रतिपादन आहे की पान, कात, चुना यापैकी एकाचाही लाल रंग नसताना त्यांच्या मिश्रणातून तो लाल रंग तयार होतो. किंवा पीठ, गुळ, पाणी या तीन पदार्थात ते स्वतंत्र असताना कैफ आणन्याचा गुण नसतो. परंतू त्यांच्या मिश्रणातून मात्र कैफ आणनारा नवीन पदार्थ निर्माण होतो. सृष्टीतील चैतन्यही याच पद्धतीने निर्माण होते.

या संदर्भात दुसरा असा प्रश्न निर्माण होतो की प्रत्येक ठिकाणी अंतीम तसे तीच असताना जगात विविधता प्रत्ययास कशी येते ? याला चार्वाकांचे असे उत्तर आहे की धान्य शिजवून खाल्ले की पोषक ठरते पण तेच धान्य सडवून खाल्ले की मात्र बाधक ठरते. म्हणजेच धान्य एकच परंतू ने भिन्न प्रकारे संयोग पावल्याने परिणाम भिन्न दिसतात. त्याप्रमाणे अंतीम तत्त्वे तीच असली तरी ती भिन्न तऱ्हेने संयोग पावल्याने सृष्टीत विविधता दिसून येते. हाच चार्वाकांचा जडतत्ववाद होय

**२) स्वभाववाद:** या मतानुसार सृष्टीतील सर्व घटना घडतात त्या केवळ सृष्टीच्या स्वभावानुसारच घडत असतात. कोकीला का गाते तर तो तिचा स्वभाव म्हणून. उस गोड का लागतो ? लिंब कडू का लागतो ? मोर का नाचतो? तर तो त्यांचा स्वभाव म्हणूनच. त्याप्रमाणे चार्वाकांच्या मतानुसार सृष्टीची निर्मिती का झाली? तर तो तिचा स्वभावच आहे.

सर्वसाधारणपणे आपण असे मानतो की विश्वातील प्रत्येक निर्मितीमागे कोणता तरी हेतू असतो व कोणीतरी निर्माता असतो. त्याप्रमाणे या विश्वाचा देखील कोणीतरी निर्माता असला पाहिजे. आणि तो म्हणजे ईश्वर असला पाहिजे. तसेच विश्वाच्या निर्मितीचा हेतू कोणाच्या तरी मनात असला पाहिजे. म्हणजेच तो ईश्वराच्या मनात असला पाहिजे असा आपला समज असतो; परंतु या सर्व गोष्टी चार्वाक नाकारतात. त्याच्या मते या सृष्टीच्या निर्मितीमागे एखादा विशिष्ट हेतू वा सृष्टीचा निर्माता ईश्वर मानण्याची आवश्यकता नाही. सृष्टीची निर्मिती तिच्या स्वभावामुळेच होते. चार महाभूते एकत्र का येतात? तर तो त्यांचा स्वभावच आहे. ती महाभूते एकत्र आली की स्वाभाविकपणे त्यातून सृष्टीची निर्मिती होते. या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की नाचणे हा मोराचा, किंवा उष्ण लागणे हा विस्तवाचा स्वभाव असेल तर तो स्वभाव त्यांना कुणी दिला? यासाठी ईश्वर का मानू नये? यावर चार्वाकांचे असे उत्तर आहे की ईश्वराला निर्माण कोणी केले? हे सर्व करण्याचे सामर्थ्य त्याला कोणी दिले ? तो जर त्याचा स्वभाव असेल तसाच स्वभाव मोर, विस्तव किंवा इतर वस्तूंच्या ठिकाणी का नाही ? या साठीच स्वभावबाद मानावा लागतो

३) देहात्मवाद : सर्वसाधारण दर्शनांचा कल आत्मा व देह या दोन गोष्टी भिन्न आहेत असे मानण्याकडे आहे. परंतू चार्वाक मात्र चेतन शरीराशिवाय एखादा वेगळा आत्मा असतो हे मान्य करत नाहीत. त्यांच्या मते सृष्टीच्या इतर पदार्थांप्रमाणेच मनुष्य देहाची निर्मिती होते. या देहाच्या ठिकाणी चैतन्य दिसू लागले की हा चैतन्य विशिष्ट देहच आत्मा होय. चार मूलतत्वांच्या संयोगातून त्याची जशी निर्मिती होते तसेच त्या मूलतत्वाच्या विघटनातून नष्ट पावते. मी उंच आहे, मी गोरा आहे असे आपण

म्हणतो तेंव्हा आपला संदर्भ देहाचाच असतो. म्हणून अशा विशेषणांनी युक्त असा देहच आत्मा होय. दुसरे असे की देहापेक्षा वेगळा असा आत्मा मानला तरी तो इंद्रिय वा मनःप्रत्यक्षाचा विषय होत नाही. म्हणून देहापेक्षा वेगळा स्वतंत्र आत्मा मानन्याची आवश्यकता नाही. काही चार्वाकांनी देहाला आत्मा न मानता इंद्रियांना आत्मा मानले आहे. त्यावरून त्यांचे देहात्मवादी व इंद्रियात्मवादी असे वेगवेगळे पंथ निर्माण झाले आहेत.परंतू चार्वाकांच्या या आत्मविषयक मतावर विरोधकांनी कडाडून हल्ला चढवल्यामुळे नंतरच्या काळात सुशिक्षित चार्वाकानी शरीर जिवंत असेपर्यंत अविकारी आत्मा असतो असे मानले. परंतु मृत्यूनंतरही आत्मा अस्तित्वात असतो हे मत मात्र त्यांनी स्वीकारले नाही. कारण लहानपणीच्या गोष्टी जशा मोठेपणी आठवतात, तसे पूर्वजन्मीच्या घटनांचे देखील मला स्मरण झाले हे कोणीही सांगू शकत नाही. म्हणून मृत्यूनंतर आत्मा अस्तित्वात नसतो असे चार्वाकांचे प्रतिपादन आहे. अशा रीतिने जडतत्ववाद, स्वभाववाद व देहात्मवाद या तिन्हीचा मिळून चार्वाकांचा जडवाद तयार होतो.

प्रश्न – चार्वाकांचा नीतिशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करा.

चार्वाक दर्शन हे अवैदिक किंवा नास्तिक परंपरेतील दर्शन आहे. चार्वाक दर्शनास बंडखोर दर्शन असेही म्हटले जाते. याचे कारण तत्कालीन समाजात मान्यताप्राप्त सर्व नैतिक संकल्पना चार्वाकांनी नाकारल्या, विशेषत: स्वर्ग, नरक, आत्मा, पुनर्जन्म, ईश्वर, कर्मकांड अशा सर्व गोष्टींना त्यांनी विरोध केला. कारण अशा गोष्टी आपल्या प्रत्यक्षाच्या निकषावर टिकू शकत नाहीत. शिवाय अशा संकल्पना नाकारल्याने आपले दैनंदिन जीवन बिघडणार नाही हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. चार्वाकानी आपले नीतिशास्त्र आपल्या दैनंदिन व्यवहारिक जीवनाशी निगडीत असले पाहिजे असे प्रतिपादन केले. आपल्या नैतिक विचारांच्या अनुषंगानेच त्यानी त्याच्या सुखवाद सांगीतल्यामुळे त्यांच्या सुखवादास नीतिशास्त्रीय सुखवाद असे म्हणतात.

पुरुषार्थविचार : भारतीय तत्त्वज्ञानात अर्थ, काम, धर्म आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ मानले आहेत. चार्वाक हे प्रत्यक्ष जीवनास प्राधान्य देणारे असल्याने ते केवळ अर्थ आणि काम हेच दोन पुरुषार्थ स्वीकारतात. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे हाच तिचा धर्म असून माणसाचा मृत्यू हाच त्याचा मोक्ष आहे. साधारणपणे मोक्षाच्या दोन व्याख्या सांगीतल्या जातात. १) जन्ममृत्यूच्या चक्रातून स्वतःची सुटका करून घेणे म्हणजे मोक्ष होय. परंतू चार्वाकांच्या मते अशा स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव कोणासही येत नाही. त्यामुळे ही व्याख्या स्वीकारता येत नाही.

२) दुःखापासून सुटका करून घेणे व चिरंतन सुखाची प्राप्ती करून घेणे म्हणजे मोक्ष होय. ही व्यारख्या चार्वाक काही प्रमाणात मान्य करून त्या अनुषंगानेच आपला सुखवाद प्रतिपादन करतात.या चार्वाकाना ' जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख' या ऐवजी ' प्रत्येक व्यक्तीचे जास्तीत जास्त सुख' हा विचार अधिक प्रभावी वाटतो.म्हणून त्यांचा त्यांचा सुखवाद अहंकेंद्री किंवा स्वार्थ सुखवाद मनाला जातो.

चार्वाकांच्या मते निर्भेळ सुख व्यक्तीच्या आयुष्यात क्वचितच मिळू शकते. कारण प्रत्येक सुखासोबत दु:ख असतेच. म्हणून आपण सुखाकडे पाठ फिरवणे योग्य नाही. शिवाय भविष्यात मिळणाऱ्या सुखाची अपेक्षा करून वर्तमान सुख नाकारणे हे मूर्खपणाचे लक्षण आहे. ज्याप्रमाणे शहाणा मनुष्य नारळावरची करवंटी काढून आतील खोबर काढून खातो, किंवा साळीवरील तूस काढून आतील तांदूळ घेतो, त्याप्रमाणे प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील दुःखाला अलगदपणे बाजूला सारून त्यातील सुखाचा उपभोग घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जीवन हे परतपरत मिळणार नसते. शिवाय एकदा जर

आपल्या देहाची राख झाली तर नंतर सुख-दुख किंवा स्वर्गनरक काहीच नसते. म्हणून जोपर्यंत हे जीवन लाभले आहे तोपर्यंत आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण आपण सुखाने जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे किंवा याच जीवनात जास्तीत जास्त सुख कसे मिळेल याचाच आपण विचार केला पाहिजे. वेळ प्रसंगी कर्ज काढावे लागले तरी हरकत नाही पण आपण तूप पिले पाहिजे असे ते लाक्षणिक अर्थाने सुचवतात.

• **इतरांची टीका :** चार्वाकांचा हा विचार समाजातील इतर दर्शनांना आवडला नाही. त्यांनी या विचारावर टीका केली. 'चार्वाक हे स्वार्थी विचारांचा पुरस्कार करतात. स्वार्थी विचार नैतिक असू शकत नाही शिवाय चार्वाक कोणत्याही मार्गाने सुख मिळवा असे सांगतात. हे सर्व नीति बाहय आहे ' अशी टीका चार्वाकांच्या सुखवादावर झाली.परंतू चार्वाकांनी आपल्या विचारात अत्यंत टोकाचा स्वार्थ सांगीतला नाही. प्रत्येक व्यक्ती आपल्या सुखाचा विचार करू लागली तर आपोआप सर्व समाज सुखी होईल अशी त्यांची धारणा होती. शिवाय चार्वाकांनी वाटेल त्या मार्गाने सुख मिळवा असे कधीच सांगीतले नाही. उलट जे समाजमान्य मार्ग आहेत, उदा. शेती, पशुपालन, व्यवसाय, शासकीय नोकरी अशाच मार्गांचा अवलंब करून जास्तीत जास्त सुख उपभोगण्याचा प्रयत्नकेला पाहिजे असे चार्वाकांचे स्पष्ट प्रतिपादन आहे.

सारांश चार्वाकांचे नीतिशास्त्र किंवा त्यांचा सुखवाद व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर आधारित व सर्व सामान्यांना आवडेल अशा स्वरुपाचा असल्यानेच अधिक महत्वाचा ठरतो.